# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नळेगाव (ता.चाकूर, जि.लातूर) येथे गुन्हेगारीमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(१) ७८३ (२०-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळेगाव (ता.चाकूर, जि.लातूर) येथे अनेक दिवसांपासून चोऱ्या, अवैध धंदे इत्यादी गुन्हेगारी घटनांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली असून येथील पोलिस चौकीकडून नागरीकांना समाधानकारक सेवा व मदत मिळत नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी तेथील नागरीकांकडून मागील १२ वर्षापासून केली जात असून अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, सदर भागातील गुन्हयांवर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर भागात नवीन पोलिस स्टेशनची निर्मिती कधी करण्यात येणार आहे?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२९-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) चाकूर पोलीस स्टेशनचे विभाजन करुन नळेगाव पोलीस स्टेशनची निर्मिती व त्यानुषंगाने पदनिर्मितीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा सुधारित एकत्रित आकृतीबंध अहवाल शासनास सादर केला आहे. प्राप्त झालेल्या आकृतीबंध अहवालाबाबत शासनाने काही मुद्दे उपस्थित केले असून, त्यानुसार नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडून मागविण्यात आलेले आहेत.

(४) नळेगाव दूरक्षेत्र अंतर्गत चालू वर्षात एकूण २ मालाविषयीचे गुन्हे दाखल असून, त्यापैकी ०१ गुन्हा उघडकीस आलेला आहे. ०१ गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

जुगार व दारुबंदी कायद्याखाली छापे मारुन जुगाराचे ०२ व दारुबंदीचे ०४ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच मोटार वाहन कायद्याखाली ७० वाहनांवर गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून १४०००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

नळेगाव दूरक्षेत्रात सध्या पोलीस चौकी आहे.

---

**मुंबईतील पूर्व उपनगरातील राजावाडी रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृहाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२) ८१४ (२१-०३-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पूर्व उपनगरातील राजावाडी रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृहाची प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाली असून येथील कर्मचा-यांना जीव मुठीत धरुन काम करावे लागत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शवविच्छेदन गृहाच्या या दुरवस्थेबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री. वाणी आणि श्री.भांगे यांनी संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे मात्र संबंधित विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार उक्त शवविच्छेदन गृहाच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-१२-२०२१) :** (१) राजावाडी शवविच्छेदन गृहाची दुरुस्ती व नुतनिकरण करण्यासाठी दि. ०९.०८.२०१९ रोजी रु.५२,९६,०००/- इतक्या रकमेस प्रशासकिय मान्यता दिली असुन दुरुस्तीचे काम चालु आहे.

(२) प्रशासनाकडून शवविच्छेदन गृहाची दुरस्तीबाबत वेळोवेळी संबंधीत विभागाशी सपर्क साधून याबाबत सतत पाठपुरावा करण्यात येतो त्यामुळे प्रशासनाकडुन कोणतेही दुर्लक्ष केले जात नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एरंडोली (जि.सांगली) येथील तरुणाची सैन्यामध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत**

**(३) १३४१ (२२-०३-२०२०). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सैन्यामध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून रोहित उर्फ प्रमोद कृष्णा शिंगाडे, रा. एरंडोली (जि.सांगली) या तरुणाची साडेचार लाख रुपये घेवुन फसवणूक केल्याचे दिनांक ०२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संजयनगर पोलीस ठाण्यात फसवणूक केलेल्या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणातील संबंधित दोषींवर कारवाई करून सदरहू व्यक्तीचे पैसे परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२१) :** (१), (२) व (३) रोहित ऊर्फ प्रमोद कृष्णा शिंगाडे यांचे सह एकूण ०९ तरुणांची आर्मीमध्ये भरती करुन देतो असे सांगून फसवणुक केलेबाबत पोलीस स्टेशन, संजयनगर, जि. सांगली येथे गु.र.नं. २९४/२०१९ भा. दं. वि. कलम ४२०, ४६८, ४७१, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दि.३१/१२/२०१९ रोजी ०३ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उक्त प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून एक आरोपी फरार आहे. फरार आरोपीस अटक करुन त्यांचेकडून फसवणूकीची रक्कम मिळविण्याच्या दृष्टीने तसेच आरोपींनी फसवणूकीच्या रक्कमेतुन खरेदी केलेली जंगम/स्थावर मालमत्ता जप्ती करण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात येत आहे.

फरार आरोपीचा शोध स्था. गु. अ. शाखा व पोलीस ठाणेकडील पथकांकडून घेण्यात येत आहे. अटक आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**माहिम (मुंबई) येथील पोलीस वसाहतींमधील पोलीसांना मालकी हक्काने घरे मिळणेबाबत.**

**(४) ५२८८ (२५-०३-२०२०). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहिम (मुंबई) येथे सन १९८० मध्ये गृह विभागाकडून पोलीसांच्या निवासस्थानाकरीता १४ इमारती रूपये ४,२७,००,००० एवढ्या किंमतीस विकत घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारती मेसर्स शिर्के विकासकाने बांधल्या असून बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे इमारतींना ३० वर्षे होण्यापूर्वी त्यावर दुरूस्तीसाठी सुमारे ३.५० कोटी रूपये खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारती विकत घेताना विकासकाबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्याचे कागदपत्रे उपलब्ध नसून निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे त्या इमारती केव्हाही पडण्याचा धोका निर्माण झाला असून सदर बांधकामाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे तसेच सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण असून तेथील पुनर्विकास योजनेमध्ये त्यांना २६९ चौ. फुटाचे घर दिले जाते तर गेली अनेक वर्षे या ठिकाणी रहात असलेल्या रहिवाश्यांना पुनर्विकासा अंतर्गत लागू विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे त्याच ठिकाणी मालकीची घरे दिली जाणार काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :**(१) व (२) होय. हे खरे आहे.

सन १९८० मध्ये म्हाडाकडून सदर इमारती पोलीसांच्या निवासस्थानाकरिता विकत घेण्यात आल्या आहेत. सदर इमारतींच्या बांधकाम दुरुस्तीसाठी इमारतींना ३० वर्ष पूर्ण होण्यापूर्वी एकूण रु.३,४६,४२,३९५/- इतका निधी खर्च झालेला आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई पोलीस दलाच्या वाढत्या मनुष्यबळाचा विचार करता शासकीय निवासस्थानांची कमतरता असल्याने सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास करण्यात येणार असून पुनर्विकासापूर्वी तेथे राहत असलेल्या पोलीसांना तेथेच मालकी तत्वावर कायमस्वरुपी निवासस्थाने देण्याची तरतूद नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## लोणी काळे (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या वर्गखोल्यांची परिस्थिती धोकादायक असल्याबाबत

**(५) ५६३० (१०-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणी काळे (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या वर्गखोल्यांची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर बसून शिक्षण घ्यावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार या वर्गखोल्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल जनहित याचिका क्र. १३०/२०१८ संदर्भात मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार शाळाची भौतिक सुविधांची तपासणी केलेली आहे. सदर तपासणीत शाळेमध्ये उपलब्ध ५ वर्गखोल्या असून त्यापैकी ३ वर्गखोल्या सुस्थितीत आहेत. २ वर्गखोल्याचे निर्लेखन करुन नव्याने बांधणे आवश्यक असून तद्नुसार कार्यवाही सुरु आहे. सदर शाळेसाठी नवीन १ वर्ग खोल्यांची आवश्यकता असल्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## सोलापूर शहरातील परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(६) ५७१७ (२५-०३-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील परिसरात चोरांनी धुमाकूळ घातला असून विडी घरकुल परिसरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विठ्ठलनगर येथील रहिवाशांच्या घरातून रोख रक्कम व सोने-चांदी असा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वे स्टेशन एसटी स्टँड समोर चोरट्यांनी वयोवृद्ध महिला व मुलीच्या अंगावरील सुमारे दीड लाखाचे दागिने पळवून नेल्याचे माहे जानेवारी वा त्या सुमारास निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेचा तपास करण्यात आला आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, तपासानुसार सदर चोरावर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) विठ्ठलनगर येथील रहिवाशी श्री. ओमप्रकाश आडम यांचे राहते घर व घरातील अगरबत्ती कारखान्यातील दरवाजे कुलुप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे व चांदीचे दागिने व इतर साहित्य असे एकूण १,८२,४००/- रुपये किंमतीचे मुद्देमाल चोरीला गेला आहे. प्रकरणी पोलीस स्टेशन एमआयडीसी येथे गु.र.नं. ०९/२०२० भा. दं. वि. स. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दि.०४/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादी ह्या मुलीसोबत विजापूरला जाण्यासाठी बसमध्ये बसून जात असताना बॅगेतील ३ तोळ्याचे दोन गंठण चोरीला गेल्याचे लक्षात आले. उक्त प्रकरणी पोलीस स्टेशन, सदर बाजार येथे गु. र. नं.१०/२०२० भा. दं. वि. स. कलम ३७९ प्रमाणे दि.०४/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर दोन्ही प्रकरणी पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन्ही गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न नसुन एमआयडीसी, पोलीस स्टेशन, सोलापूर येथे दाखल गुन्ह्यात मा.न्यायालयात 'अ' फायनल मंजुरीकरीता पाठविण्यात आला आहे. तर पोलीस स्टेशन, सदर बाजार येथे दाखल गुन्ह्याचा तपास सूरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील म्हारळ वरप आणि काबा या ग्रामीण भागात स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याबाबत

**(७) ११७१८ (१३-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील म्हारळ वरप आणि काबा येथे मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून या ग्रामीण भागासाठी वेगळे पोलीस स्टेशन असावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री आणि ठाणे जिल्हा पालकमंत्री व ठाणे जिल्हा समितीच्या बैठकीत केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण भागात काही घटना घडल्यास नागरिकांना ९ कि. मी. अंतरावरील टिटवाळा येथे जावे लागत असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हारळ येथे साधी पोलीस चौकी असून तेथे कोणत्याही प्रकारची तक्रार नोंदविली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ठिकाणी स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२१-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) होय, अशंत: खरे आहे.

म्हारळ येथील पोलीस चौकीची जागा ही अंत्यत लहान असून, सदर चौकी राष्ट्रीय महामार्ग क्र.६४ च्या रुंदीकरणात बाधित होत आहे. त्यामुळे सदर जागेचा विकास करणे शक्य होत नाही. तसेच सदर चौकीस कोणतीही शासकीय जागा उपलब्ध नसून, सदर चौकी ही तात्पुरता निवारा म्हणून वापरात असून, चौकीत तक्रार नोंदविण्याकरीता कोणत्याही सुविधा नसल्याने तेथे लेखी तक्रारी नोंदविल्या जात नाहीत.त्यासाठी नागरीकांना टिटवाळा येथील पोलीस ठाण्यास जावे लागत आहे.
(४) पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस आयुक्त,ठाणे यांचेकडून प्रस्ताव मागवला आहे.सदरचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जोगेश्वरी पूर्व (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील मेघवाडी, जोगेश्वरी व आरे पोलीस स्टेशनच्या इमारतींचे बांधकाम करण्याबाबत**

**(८) १२५१८ (१०-०८-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी पूर्व (मुंबई) हे क्षेत्र संवेदनशील क्षेत्र म्हणून पोलीस प्रशासनाच्या दफ्तरी नोंद असून या क्षेत्रात मेघवाडी, जोगेश्वरी व आरे ही तीन पोलीस ठाणे येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तिन्ही पोलीस ठाण्यांच्या इमारतीच्या विकासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी माहे एप्रिल, २०११ पासून पाठपुरावा करत असून त्यांनी अनेकदा संबंधितांकडे पत्रव्यवहार केला आहे तसेच दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांना याबाबत अवगत केले असून अंदाज समितीचा पाहणी दौरा आयोजित करून येथील दुरवस्थाही शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेघवाडी पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीसाठी प्रस्तावित व राखीव जागा ताब्यात घेऊनही मंजूर झालेल्या निधीतून या नवीन इमारतीचे काम सुरु होण्यास विलंब होत असल्याने अद्यापि मेघवाडी पोलीस ठाणे भाड्याच्या जागेत आपले कामकाज करीत असून निधी मंजूर असतानाही प्रत्यक्षात काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-१२-२०२१) :** (१) होय.
(२) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी दि.२१.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील मेघवाडी, जोगेश्वरी व आरे पोलीस ठाणे इमारतींचे सक्षमीकरणकरुन प्रशासकीय सुविधा प्राप्त करुन देण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली आहे.
(३), (४) व (५) मेघवाडी पोलीस ठाणेच्या इमारतीकरिता न.भु.क्र.३, जागेश्वरी (पूर्व), मौजे-इस्मालिया, ता.अंधेरी, मुंबई येथील २०२८.८चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखड राखीव ठेवण्यात आला आहे. सदर भूखंडावरील अतिक्रमण असलेल्या ३२ झोपडीधारकांपैकी २३ पात्र झोपडीधारकांना झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचेकडून पर्यायी सदनिका वाटप करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारे २३ पात्र व ०९ अपात्र झोपडयांचे निष्कासन करण्यात आले असून, सदर भूखंड मोकळा करुन घेण्यात आला आहे. सदर जागेवर मेघवाडी पोलीस ठाण्याची इमारत बांधणेसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा कार्यालयाकडून तसेच वाकोला, मेघवाडी, मालाड व गोरेगाव या चार पोलीस ठाणेच्या इमारती बांधकामाकरीता डी.पी.डी.सी. फंडातून रु. ८,६९,१४,०००/- इतका निधी मंजूर असून त्यापैकी मेघवाडी पोलीस ठाणेकरिता रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी) व दि.१५/७/२०२० रोजी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळास पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडून आतापर्यंत वर्ग केला आहे.

तद्नंतर मेघवाडी पोलीस ठाणेकरिता दि.२५/१०/२०२१ रोजी रु.५,९७,८२,०८३/- (रुपये पाच कोटी सत्याण्णव लाख ब्याऐंशी हजार त्र्याऐंशी फक्त) असा एकूण प्राप्त झालेला रुपये ७,९७,८२,०८३/- (रुपये सात कोटी सत्याण्णव लाख ब्याऐंशी हजार त्र्याऐंशी फक्त) इतका मंजूर निधी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळास पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडून आतापर्यंत वर्ग केला आहे.
प्रस्तावित इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी, मुंबई यांचेमार्फत करण्यात येणार असून इमारतीच्या आराखडयास बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून मंजुरी अपेक्षित आहे.

---

**मौजे शिराळा (ता.शिराळा, जि.सांगली) येथील मोरणा मध्यम प्रकल्पातील तलावाच्या संपादित क्षेत्रात अनधिकृतपणे मत्स्य संवर्धन व मत्स्यबीज प्रकल्प सुरू असल्याबाबत**

**(९) १२९४० (१०-०७-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिराळा (ता.शिराळा, जि.सांगली) येथील मोरणा मध्यम प्रकल्पातील मोरणा तलावाच्या संपादित क्षेत्रात शिराळापेठा भोईराज मच्छिमारी सहकारी संस्थेचा अनधिकृतपणे मत्स्य संवर्धन व मत्स्यबीज प्रकल्प सुरू असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित संस्थेने या प्रकल्पासाठी विनापरवाना, अनाधिकृतपणे मोठ्या प्रमाणात मोरणा तलावाच्या संपादित क्षेत्रात खोदकाम, विविध बांधकामे, टॉवर उभारणे, भिंती बांधणे इत्यादी कामे केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पातील मत्स्यपालनाकरिता विविध खाद्य पदार्थ, औषधे, रसायने दररोज या तलावामध्ये मिसळली जात असुन या तलावाच्या पाण्यावरती अवलंबून असलेल्या शिराळा शहर व आसपासच्या ३५ ते ४० खेडेगावातील नागरिकांना अनेक साथींचे आजारास बळी पडावे लागत असल्याने या नागरिकांनी या संस्थेविरोधात आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून संबंधित संस्था व ज्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले त्यांच्यावर कारवाई करण्यासह सदर अनधिकृत बांधकामे तात्काळ निष्कासित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे

(२) अंशतः खरे आहे.

(३) हे खरे नाही.

या प्रकल्पातील मत्स्यपालनाकरिता संस्थेने मत्स्यबीज खाद्य म्हणून शेंगदाणा पेंडीचा वापर केला आहे. यामुळे मानवी जीवावर परिणाम होत नाही. संबंधित संस्थेने संवर्धन तलावामध्ये औषधी रसायनांचा वापर केल्याचे दिसून येत नाही.

(४) व (५) संस्थेने विहित परवानगी न घेता तळी तयार केली आहेत. परंतु बांधकाम केलेले नाही. मोरणा धरण क्षेत्रात मत्स्यसंवर्धन तळ्यांचे केलेले काम हे अनधिकृत असून याबाबत कारवाई करणेचे अधिकार पाटबंधारे विभागाचे आहेत. सदरहू बाब पाटबंधारे विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील चिकू बागायतदार तसेच डहाणू तालुक्यामध्ये अत्याधुनिक पद्धतीने ढोबळी मिरची आणि मिरची उत्पादक यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(१०) १३१९६ (१४-०९-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनामुळे ताळेबंदी असताना पालघर जिल्ह्यातील चिकू बागायतदार व डहाणू तालुक्यामध्ये अत्याधुनिक पद्धतीने ढोबळी मिरची आणि मिरची उत्पादक यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फळ पीक विमा योजनेत वातावरणाशी निगडीत काही जाचक अटी या योजनेत अंतर्भूत केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने चिकू बागायतदार व मिरची उत्पादक यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, चौकशी केली आहे.

(४) चिकू उत्पादक शेतकऱ्यांना शासन निर्णयानुसार विमा नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) येथील पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(११) १४२५९ (२६-०८-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) येथील पोलीसांना स्टेशनची निजामकालीन इमारत मोडकळीस आल्यामुळे पोलिसांनी काम करताना गैरसोय होत असून त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस स्टेशनच्या बांधकामाचा प्रस्ताव गृह विभागाकडे प्राप्त झाला असून त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पोलिस स्टेशनच्या बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) पोलीस स्टेशन सेलूसाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतच्या पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून प्राप्त प्रस्तावावर प्राधान्यक्रम व निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची बाब पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे विचाराधीन आहे.

---

**करोनाच्या पार्श्वभूमीवर भांडुप, मुलुंड, विक्रोळी (मुंबई) या ठिकाणी शवविच्छेदन केंद्रात वाढ करण्याबाबत**

**(१२) १६४६० (२५-११-२०२०). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सध्या कोरनाचा मोठ्या प्रमाणात संसर्ग होत असून मृतांची संख्याही वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भांडुप, मुलुंड, विक्रोळी, घाटकोपर या ठिकाणच्या शवविच्छेदनासाठी घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालय हे एकमेव केंद्र असल्यामुळे मृतांची वाढती संख्या लक्षात घेता शवविच्छेदनास अक्षम्य विलंब होत असल्याने रुग्णांच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त परिस्थितीचा विचार करता लोकांना सुविधा होण्यासाठी भांडूप, मुलुंड येथे

मुंबई महानगरपालिकेच्या अथवा शासकीय जागेवर शवविच्छेदन केंद्र सुरु करण्याची मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.पालकमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार भांडूप, मुलुंड येथे मुंबई महानगरपालिकेच्या अथवा शासकीय जागेवर शवविच्छेदन केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-१२-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे. काही विशिष्ट कालावधीत मृतांची संख्या वाढली होती.
(२) हे खरे नाही. Medico- Legal Cases वगळता इतर कोरोना मृत्युचे शवविच्छेदन करावे लागत नाही, त्यामुळे कोरोनाच्या कारणास्तव शवविच्छेदनास विलंब होत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रांतर्गत पूर्व उपनगरातील पंडित मदन मोहन मालविय, शताब्दी रुग्णालय, गोवंडी येथे पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सुरु असणाऱ्या नविन इमारतीच्या लगतच शवविच्छेदन केंद्रासाठी जागा राखीव ठेवण्यात आली असून त्याचे आराखडे बनवून महापालिकेच्या प्रचलित पध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच, क्रांतीज्योती महात्मा फुले रुग्णालय, विक्रोळी पूर्व येथे पुनर्विकास प्रकल्प सुरु असून तेथे शवविच्छेदन केंद्रसाठी लागणारी आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने विक्रोळी, कांजूरमार्ग, भांडूप आणि मुलुंड या परिसरामध्ये उपलब्ध जागेचा शोध घेवून शवविच्छेदन केंद्र लवकरच प्रस्ताविण्यात येणार असल्याचे नगर विकास विभागाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे गुळंब (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील मत्स्यबीज उत्पादन प्रकल्पास होत असलेला विलंब

**(१३) २०२७४ (१३-१२-२०२०). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जंगमहट्टी, तिलारी, फाटकवाडी, आंबेवाडी, कळसगादे, पाटणे, जांभरे, उमगाव, करंजगाव (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) हे छोटे मोठे पाटबंधारे प्रकल्प कार्यान्वित असुन आजरा, गडहिंग्लज, तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण ७० प्रकल्पांचा विचार करून मौजे गुळंब (ता.चंदगड) येथे शासनाने मत्स्यबीज प्रकल्प सुमारे १० कोटी खर्च करुन उभारला, परंतु सदर प्रकल्प तांत्रिक कारणाने सुरु होण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मत्स्यबीज उत्पादन करण्यासाठी बांधलेल्या पॉन्डस मधील पाणी पाझरून जात असल्याने उक्त प्रकल्प सुरु होण्यास विलंब होत असताना संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूरसह आजूबाजूच्या जिल्ह्यांतील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना मंगलोर, केरळ, कोलकत्ता अशा लांब ठिकाणाहून मत्स्यबीज आणावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मौजे गुळंब येथे मत्स्यबीज प्रकल्प सुरु करुन तसेच जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

शासनाने सन १९९८ मध्ये राष्ट्रीय मत्स्यबीज उत्पादन कार्यक्रमांतर्गत तिल्लारीनगर (कळसगादे व कोदाळी) येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्राला (रु. ९४.८८ लक्ष खर्चासह) मंजूरी दिली होती.

(२) नाही.

केंद्राची जागा खडकाळ असल्याने व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने केंद्र कार्यान्वित करण्यास अडचणी येत असल्या तरी तत्कालीन अधिकाऱ्यांनी वेळोवेळी संबधित महाविद्यालये व शास्त्रज्ञ तसेच अधिकाऱ्यांचे सल्ले मागविले आहेत, तसेच प्रायोगिक तत्वावर मत्स्यबीज संवर्धनाचे प्रयत्न ही केले आहेत.

(३) नाही.

संबधित मत्स्यव्यावसायिकांना शासकीय मत्स्यबीज केंद्र सोलापूर, सातारा, पुणे खोपोली या ठिकाणाहून मत्स्यबीज आणण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. या शिवाय काही मत्स्यव्यावसायिक हे कर्नाटक, आंध्रप्रदेश मधून मत्स्यबीज आयात करतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**कोपरगाव (जि. अहमदनगर) ग्रामीण पोलीस स्टेशन कोळपेवाडी येथे स्थलांतरित करण्याबाबत**

**(१४) २७१०२ (१७-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) तालुक्यात कोपरगाव शहर व कोपरगाव ग्रामीण अशी दोन स्वतंत्र पोलीस स्टेशन असून कोळपेवाडी येथील पोलीस दूरक्षेत्र कार्यालय असून या कार्यालयाला काही गावे जोडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोपरगाव तालुक्यातील काही गावे राहाता पोलीस स्टेशनला जोडली गेल्यामुळे या पोलीस स्टेशनवरील कार्यभार वाढल्यामुळे अवैध व्यवसाय व गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे कोपरगाव शहर पोलीस स्टेशनला तालुक्याच्या पूर्व भागातील गावे जोडून तालुक्याचा पश्चिम भाग व राहाता पोलीस स्टेशनला जोडलेली गावे कोळपेवाडी पोलीस स्टेशनला जोडून कोळपेवाडी स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२१-१२-२०२१) :**(१) होय.

(२) कोपरगांव व राहाता पोलीस ठाण्याची सन २०२० मधील गुन्हयांची सरासरीची आकडेवारी विचारात घेता, गुन्हयांचे प्रमाण अंशत: वाढले आहे.

(३) शासन स्तरावर प्रस्ताव अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. पोलीस महासंचालक यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरु ठेवण्याबाबत**

**(१५) २७१४४ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेतून ग्रामीण भागातील रस्त्यांना मिळणारा निधी अपुरा पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून निधी उपलब्ध करुन मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२०-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजुर रस्त्यांकरिताच निधी वितरित करण्याचे शासनाचे धोरण आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत कोपरगाव मतदार संघातील एकुण ७७.५१ कि.मी. लांबीची एकुण रू.५०२८.३५ लक्ष किंमतीची कामे मंजुर असून सदर कामांकरिता रू.३४९७.७२ लक्ष इतका निधी खर्च झाला असून उर्वरित निधी हा निधीच्या उपलब्धतेनुसार वितरित करण्याचे नियोजन आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकरिता मा.मंत्रीमंडळाने सन २०१५-१६ ते २०१९-२० या ५ वर्षाकरिता निश्चित केलेले उद्‌दिष्टानुसार, आतापर्यंत पुर्ण लांबीस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सद्यस्थितीत सदर योजनेचे उद्‌दिष्ट संपुष्टात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वडगाव (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथे जातपंचायतीच्या लोकांनी एका महिलेला थुंकी चाटण्याची शिक्षा दिल्याबाबत**

**(१६) २७२८० (०९-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथे एका घटस्फोटीत महिलेने दुसरे लग्न केल्यामुळे जातपंचायतीच्या लोकांनी त्या महिलेस थुंकी चाटण्याची शिक्षा दिली असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जातपंचायतीच्या दहा सदस्यांविरुध्द चोपडा शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तिचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीनुसार दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय,
(२) व ३) पिडीत महिला व तिच्या कुटुंबास समाजातून बहिष्कृत करणे, पिडीत महिलेस थुंकी चाटण्याची शिक्षा सुनावणाऱ्या जात पंचायतीच्या १० पंचांविरूध्द पोलीस स्टेशन पिजर, जि. अकोला येथे गु.र.क्र. १७०/२१, सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण अधिनियम, २०१६ कलम ५, ६ आणि भा. दं. वि. कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, सदरील आरोपींविरूध्द मा. न्यायालयात क्र. ३६/२१, दिनांक २८.०६.२०२१ अन्वये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिना कोळेगांव (ता. परांडा, जि.उस्मानाबाद) धरणातील जलसाठयात विष प्रयोग झाल्यामुळे मासे मृत्यूमुखी पडल्याबाबत**

**(१७) २८५९८ (१०-०६-२०२१). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिना कोळेगांव (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) धरणातील जलसाठयात अज्ञाताकडून विष प्रयोग झाल्यामुळे मोठया प्रमाणात मासे मृत्यूमुखी पडल्याचे दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालवाच्या पाणी साठयावर विसंबून असलेल्या पाणी पुरवठा योजनांमुळे मानवी आरोग्यास धोका निर्माण झाल्यामुळे संबंधीत डोमगांव ग्रामपंचायतीने सदर घटनेची चौकशी करण्याबाबतचे निवेदन संबंधितांना दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदरहू जलाशयावर मासेमारी करणाऱ्या संस्थेकडून व डोमगाव ग्रामपंचायतीकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, उस्मानाबाद यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, परांडा, जि.उस्मानाबाद यांना आवश्यक चौकशी करण्याबाबत कळविले आहे.

जलाशयातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी केंद्रीय मत्स्यशिक्षण संस्था, मुंबई व फूड हायजीन अण्ड हेल्थ लबोरेटरी, फूडटेस्टींग अण्ड एनव्हायरमेंटल मानिटरींग, पुणे या संस्थाकडे पाठविण्यात आले होते.संबधित संस्थांच्या अहवालामध्ये प्राणवायूच्या कमतरतेमुळे मासळी मरण पावल्याचे नमूद आहे. परंतु विषबाधा झाली, असे प्रयोगशाळेच्या अहवालानुसार सिद्ध झाले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**अकोला जिल्ह्यात सोयाबीन पिक विम्यामध्ये झालेला गैरप्रकार**

**(१८) ३००५५ (१७-०६-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत सन २०१९-२०२० या कालावधीत पिक विमा कंपनीकडून ५२ महसूल मंडळांपैकी फक्त १ महसूल मंडळात सोयाबीन पिकांसाठी पिक विम्याचा लाभ देण्यात येऊन शेष ५१ महसूल मंडळात सोयाबीन पिक विमा नामंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंडगाव महसूल मंडळात मौजे पाटसूल (ता.अकोट, जि.अकोला) येथील शेत गट क्रमांक १३५ मध्ये कृषी खात्यातून सन २०१९-२० या वर्षाकरिता सोयाबीन पिक कापणी प्रयोग करण्यात आला असून सदर शेतात कृषी खात्याचे कृषी सहाय्यक पिक कापणी प्रयोगाच्या दिनांकास गेले असता शेतात सोयाबीन पिक अस्तित्वातच नसताना उपस्थित कृषी सहाय्यकांनी हेक्टरी १२.२२ क्विंटल सोयाबीन पिक उत्पादनाचा अहवाल विमा कंपनीस दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात संबंधित शेतकऱ्याने कृषी खाते व विमा कंपनी यांनी फसवणूक केल्याची तक्रार दिनांक २८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास चोहोट्टा बाजार, (ता.अकोट) येथील पोलीस चौकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मौजे आलेवाडी (ता.अकोट) येथे सन २०१९-२०२० या कालावधीत कृषी खात्याकडून ज्या शेतकऱ्यांच्या शेतात सोयाबीन पिक कापणी प्रयोग दाखविला असून प्रत्यक्षात त्या शेतकऱ्यांनी मुळात सोयाबीन पिकाची पेरणीच केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधिनी दिनांक २५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास यासंदर्भात चौकशी करुन कारवाई करण्याकरिता जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे तक्रार सादर केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या गैरप्रकरातील संबंधितांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (२४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सन २०१९-२० मध्ये मुंडगांव महसुल मंडळात सोयाबीन पिकाचे पीक कापणी प्रयोग हे नयनापुर, मुंडगाव (यंत्रणा महसुल), हिलालाबाद, शहापुर प्ररुपगड (यंत्रणा जि.प.), रौदळा, वारुळा (यंत्रणा कृषी) या गावामध्ये घेण्यात आलेले होते. तथापि, मौजे पाटसुल व आलेवाडी ह्या गावांमध्ये खरीप सन २०१९ मध्ये पीक कापणी प्रयोग घेण्यात आले नाहीत.

(३) हे खरे नाही.

तथापि, खरीप २०२० मध्ये मौजे पाटसूल व आलेवाडी या गावांमध्ये सोयाबीन पिकाचे पीक कापणी प्रयोग कृषी यंत्रणेमार्फत घेण्यात आले असून, सदर पिक कापणी प्रयोगाबाबत तक्रार नोंदविलेली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

मा. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी सन-२०१९-२० मध्ये मुंडगाव सर्कल मध्ये सोयाबीन पिकाचा पिक कापणी प्रयोग न करता, शासनास खोटी माहीती कळविल्यामुळे शेतकरी सोयाबीन पिक विमा लाभापासून वंचीत राहील्याने कार्यवाही करणेबाबत मा. जिल्हाधिकारी अकोला यांना दि. २४/५/२०२१ रोजी पत्राद्वारे कळविलेले आहे. याअनुषंगाने कृषि सहायक यांच्याकडून खुलासा मागविण्यात येवून खुलाश्यात प्राप्त माहितीनुसार कृषि सहायक यांचेकडून अनावधानाने पाटसूले येथील दोन शेतकऱ्यांचे उत्पादन नोंदविताना एकमेकांच्या नावे दाखविण्यात आल्याचे दिसून येते. तथापि, यामुळे एकूण सरासरी उत्पादनाच्या आकडेवारीमध्ये काही परिणाम होत नाही तसेच पाटसूल येथील शेतकऱ्यांच्या जबाबानुसार गट क्र.१३५ मध्ये श्री. मुरलीधर काळे यांनी सोयाबिन पिकाची पेरणी केली होती. तथापि, अतिपावसामुळे सोयाबिन पीक समाधानकारक नसल्यामुळे पीक कापणी प्रयोगासाठी टाकलेला रँडम प्लॉट बाजूला ठेवून सोयाबिन पीक वखरुन त्या क्षेत्रावर हरभरा पीक घेण्याचे संबंधित शेतकऱ्यांने ठरवले होते. सबब, सदर रँडम प्लॉट वर पीक कापणी प्रयोग घेण्यात आला असून सदर प्रयोग CCE मोबाईल ॲप वर नोंदविला आहे. सबब उत्पादन नोंदविताना केलेल्या चुकीमुळे तालुक्यात तक्रार उद्भवली असल्याने भविष्यात अशा प्रकारची चूक होणार नाही याबाबत कृषी सहायक यांना तालुका कृषी अधिकारी स्तरावर सक्त ताकीद देण्यात आली आहे.

तसेच आलेवाडी येथील श्री दामोदर वानखेडे गट क्र.१७१ व श्री श्रीराम वानखेडे गट क्र.१५६ मध्ये पीक कापणी प्रयोग घेण्यात आले असून दोन्ही प्रयोग CCE मोबाईल ॲप वर नोंदविण्यात आले आहेत. तसेच आलेवाडी गावाच्या तक्ता क्र.२ वर ग्रामपंचायत प्रशासक व ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरी असून श्री श्रीराम वानखेडे यांनी सोयाबीन पीक अस्तित्वात असल्याबाबत लेखी अहवालात नमूद केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने पीक विम्याचा हप्ता भरलेला नसल्यामुळे शेतकरी नुकसान भरपाईपासुन वंचित राहिले असल्याबाबत

**(१९) ३२२३० (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत पीक विम्याचा एकूण २४३८ कोटी पैकी केवळ १४९५ कोटींचा हप्ता भरला असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ९४३ कोटी रुपयांचा पीक विम्याचा हप्ता राज्य शासनाने न भरल्यामुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने पीक विम्याचा हप्ता न भरण्याची कारणे काय आहेत, पीक विम्याचा हप्ता न भरल्याने जिल्हा तालुका निहाय किती शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उर्वरित पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) खरीप २०२० हंगामात पिक विमा योजनेमध्ये सहभागी शेतकरी हे स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत कोविड-१९ ची लाक्षणिक स्थिती, शेतकऱ्यांकडे स्मार्ट फोन नसणे, इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या समस्या, टोल फ्री क्रमांक न लागणे, पिक विमा ॲप वर सूचना न देता येणे. शासकीय तसेच विमा कंपनीची कार्यालय पूर्ण क्षमतेने चालू नसणे, प्रवास विषयक शासनाच्या निर्बंध अशा विविध कारणांमुळे शेतकरी नुकसान होऊनही विमा कंपन्यांना सूचना देऊ शकले नाहीत. यामुळे नुकसान होऊनही अनेक पात्र शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहीले आहेत. त्या अनुषंगाने NDRF चे पंचनामे गृहीत धरुन नुकसान भरपाई निश्चित करुन नुकसान भरपाई वाटप न केल्याने राज्य शासनाने दुसरा विमा हप्ता अनुदान वाटप केले नाही. त्यानुषंगाने NDRF चे पंचनामे गृहित धरुन नुकसान भरपाई वाटप न करणेबाबत सर्व विमा कंपन्यांना आदेशित करणेबाबत केंद्र शासनास दि. १३.०७.२०२१ व दि. ०८.१०.२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

खरीप हंगाम २०२० मध्ये योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार एकूण १५.५६ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. १०६७.९९ कोटी निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी १२.३६ लाख शेतकरी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रु. ८४४.६४ कोटी जमा करण्यात आली असून उर्वरित ३.२० लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. २२३.३५ कोटी वाटपाची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित प्रलंबित राज्य हिस्सा विमा हप्ता देय अनुदान रक्कम रु. ९४१.३३ कोटी अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील एमआरजीएस अंतर्गत कामांना मान्यता नसल्याबाबत**

**(२०) ३२२९६ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा विशेषत: चिखली विधानसभा मतदारसंघाचा कृती आराखडा तयार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे कृती आराखड्यात असतानासुद्धा अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे कामांना मान्यता देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामांना मान्यता न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०१-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

पंचायत समिती चिखली अंतर्गत ९९ ग्राम पंचायत असून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये कृति आराखड्यामध्ये समाविष्ट कामांची संख्या १२२४४ आहे. मागणीनुसार अद्यापपर्यंत ५५७ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ४०४ कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई पोलीस दलातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(२१) ३२३९६ (२३-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकांच्या ४०,४७० मंजूर पदांपैकी ६,७३७ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस आयुक्त दर्जाच्या ५,५९० मंजूर पदांपैकी १,७०६ पदे देखील सद्यस्थितीत रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहराची वाढती लोकसंख्या, वाढत असलेले गुन्हे यामुळे राज्यातील इतर शहराच्या तुलनेत मुंबईत मनुष्यबळ अधिक लागत असल्याने सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-१२-२०२१) :** (१) व (२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक संवर्गाची एकुण ४५३७७ पदे मंजूर असून त्यापैकी ३५७१३ पदे कार्यरत व ९६६४ पदे रिक्त आहेत. तसेच पोलीस उप निरीक्षक ते पोलीस आयुक्त संवर्गाची एकुण ५८८२ पदे मंजूर असून त्यापैकी ४४४७ पदे कार्यरत व १४३५ पदे रिक्त आहेत.
(३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील अधिका-यांची पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच पोलीस भरती-२०१९ अंतर्गत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपाई संवर्गाची १०७६ पदे व पोलीस शिपाई चालक संवर्गाची १५६ पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत होत असलेल्या गैरकारभाराबाबत**

**(२२) ३२४१३ (१२-०८-२०२१). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी लाभार्थ्यांकडून प्रस्ताव दाखल झाले नसतानाही त्यांना लाभ देण्यात आला असल्याचे लेखा परीक्षणात समोर आल्याचे दिनांक ४ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लाभामध्ये पिको फॉल मशीन, शेवई मशीन, मिरची कांडप मशिन याचा पुरवठा असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सदर प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-१२-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे. परभणी जिल्हा परिषदेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण दिनांक २३/१०/२०१७ ते दिनांक १६/१२/२०१७ या कालावधीत झाले. सदर लेखापरीक्षणा दरम्यान जिल्हा उपकर अंतर्गत २०% परभणी जिल्हा परिषदेतील समाजकल्याण विभागांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी पिको फॉलमशीन-३५ प्रस्ताव, शेवई मशिन-२३ प्रस्ताव, मिरची कांडप मशिन १९ प्रस्ताव असे एकूण ७७ प्रस्ताव दर्शविण्यात आले नव्हते. सद्यस्थितीत सदरील योजनेचे पिको फॉलमशिन-३५ पैकी १८ प्रस्ताव, शेवई मशिन-२३ पैकी ०९ प्रस्ताव, मिरची कांडप मशिन १९ पैकी ०९ प्रस्ताव असे एकूण ३६ प्रस्ताव उपलब्ध आहेत. सदरील योजनेचे उपलब्ध नसलेले एकूण ४१ प्रस्ताव लाभधारकांकडून संकलीत करुन सादर करण्यात येत आहेत.

(२) होय. हे खरे आहे. लाभार्थ्यांना पिको फॉल मशिन, शेवई मशिन, मिरची कांडप मशिन याचा पुरवठा झालेला आहे.

(३) होय. प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून संबंधित दोषी आढळून आलेल्या कर्मचा-याची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हा परिषदेच्या कामात मोठया प्रमाणात अनियमितता झाल्याबाबत**

**(२३) ३२४१४ (११-०८-२०२१). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परभणी जिल्हा परिषदेच्या रस्ते दुरुस्ती, सार्वजनिक शौचालय बांधकाम, तसेच खुद्द जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निवासस्थान दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे लेखा परीक्षणात समोर आल्याने अंदाजे १कोटी ४६ लाख रुपयांची कामे ही संशयीत स्वरूपाची झाल्याचे दिनांक ८ जुलै २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या स्थानिक निधी लेखापरीक्षा संचनालयाच्या वतीने २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या विविध कामकाजाचे लेखापरीक्षण करून या संबंधीचा अहवाल नुकताच जाहीर करण्यात आल्याचे समजते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन सदर प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर सखोल चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) (२) सन २०१६-१७ च्या लेखा परिक्षणात बांधकाम विभागाचे रस्ते दुरुस्तीची ०७ कामे रुपये १३५.७१ लक्ष, सार्वजनिक शौचालय बांधकाम ०१ रु. ९.६१ लक्ष व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे निवासस्थान दुरुस्ती व विद्युतीकरण रु.२७.७५ लक्ष रक्कमेच्या कामाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले असुन सदर कामामध्ये अनियमितता झाले बाबत आक्षेप नोंदविल्याची बाब खरी आहे.
(३) आक्षेपाच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत लेखा परिक्षण पुर्तता अहवाल सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, परभणी यांस सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पशुधनामध्ये लम्पी रोगाचा मोठया प्रमाणात प्रार्दुभाव झाल्याबाबत**

**(२४) ३२५८५ (२२-११-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नाशिक, जळगाव, पालघर, पुणे जिल्हयांमधील जनावरांवर लम्पी नावाचा त्वचा (स्कीन) रोगाचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणात होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लम्पी रोग विषाणुजन्य चर्मरोग तसेच साथीचा आजार असुन सदर रोगावरील प्रतिबंधक लस पुरवठा न झाल्यामुळे राज्यातील २ कोटी पशुधनांवर त्याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता शेतकरी व पशुपालकांमध्ये निर्माण झाली असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील जनावरांवर लम्पी स्कीन आजाराचा प्रादुर्भाव व संसर्ग वाढत असून लस मिळत नसल्याने पशुपालकांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रोगावरील लस पुरवठा तातडीने केंद्र शासनाकडून होण्याबाबत तसेच रोगाचा प्रार्दुभाव रोखण्यासह देवळा तालुक्यातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०१-१२-२०२१) :** (१) लम्पी स्कीन या विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे
(२) हे खरे नाही. नाशिक, जळगाव, पालघर व पुणे जिल्ह्यातील लसीकरण करावयाच्या एकूण ९,५२,८३३ पशुधनापैकी ९,३७,८९६ पशुधनास प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येवून लम्पी चर्मरोगाचा वेळीच प्रतिबंध करण्यात आलेला आहे.
(३) हे खरे नसून, केंद्र पुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण या कार्यक्रमांतर्गतच्या ॲस्कॅड योजनेमधून आर्थिकदृष्या महत्वाच्या रोगाचे लसीकरण करणे या योजनेअंतर्गत वितरित झालेल्या केंद्र व राज्याच्या निधीमधून लम्पी चर्मरोगावरील एकूण २,५९,२०० गोट पॉक्स लसमात्रा खरेदी करण्यात आलेली असून, यापैकी नाशिक जिल्ह्यासाठी १,३०,००० लसमात्रा पुरवठा करण्यात आलेली आहे. तसेच, जिल्हा कार्यालयाकडून विविध योजनांमधून एकूण ४,७१,६०० लसमात्रा देखील उपलब्ध झालेली आहे. देवळा तालुक्यातील १४,५३० पशुधनास लसीकरण करण्यात आलेले असून, सद्य:स्थितीत देवळा तालुक्यात तसेच, नाशिक जिल्ह्यात लम्पी रोगाचा प्रादुर्भाव नाही.

देवळा तालुक्यात एकूण १२ पशुवैद्यकीय दवाखाने असून, ०६ पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असून, या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेला आहे. बाधित पशुधनावरील औषधोपचार व प्रतिबंधात्मक लसीकरणासाठी रिक्त पदांमुळे विशेष अडचणी निर्माण झालेल्या नाहीत.
(४) केंद्र शासनाकडून लम्पी चर्मरोगावरील प्रतिबंधात्मक लसीचा पुरवठा होत नसून, केंद्र पुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण या कार्यक्रमांतर्गतच्या ॲस्कॅड योजनेमधून तसेच जिल्हा स्तरावर विविध योजनांमधून स्थानिकरित्या लसमात्रांची खरेदी करून ती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

देवळा तालुक्यामधील पशुधन विकास अधिकारी यांची ०५ पदे रिक्त असून, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या ४३२ पशुधन विकास अधिकारी यांना पदस्थापना देण्यात येणार असून त्यामधून देवळा तालुक्यातील काही रिक्त पदे भरली जाणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री क्षेत्र झुंज (ता.वरुड, जि.अमरावती) येथे वर्धा नदीच्या पात्रात नाव उलटून व्यक्ती बेपत्ता झाल्याबाबत**

**(२५) ३२६३७ (१५-११-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री क्षेत्र झुंज (ता.वरुड, जि.अमरावती) येथील शहीद पोलीस ठाण्यांतर्गत येथे वर्धा नदीत

नाव उलटून दशक्रिया विधीसाठी गेलेल्या गाडगाव येथील एकाच कुटुंबातील ११ जण बुडाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेतील ३ मृतदेह सापडले असून ८ व्यक्ती बेपत्ता असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर-अमरावती जिल्हयाच्या सीमेवरील झुंज धबधब्यावर पर्यटक मोठया प्रमाणात येत असल्यामुळे मच्छीमारांच्या होडयामध्ये नाविक अनेकदा क्षमतेपेक्षा जास्त पर्यटकांना बसवून जलसफारी घडवतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जलसफारी करतांना जीवरक्षक साधनांचा वापर करण्यात येत नसणे तसेच त्यांच्याकडे मच्छीमारी किंवा पर्यटन असा कोणताही परवाना नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेपत्ता व्यक्तिंचा शोध घेऊन संबंधित दोषींवर कारवाई करणे तसेच श्री क्षेत्र झुंज याचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) होय.

श्री.क्षेत्र झुंज (ता. वरुड, जि. अमरावती) येथील बेनोडा शहीद पोलीस ठाण्याअंर्तगत वर्धा नदीत नाव उलटून दशक्रिया विधीसाठी गेलेले गाडगाव येथील ११ जण बुडाल्याची घटना दि. १४ सप्टेंबर, २०२१ रोजी घडली आहे. तथापि, सदर ११ व्यक्ती एकाच कुटुंबातील नाहीत.
(२) घटनेच्या दिवशी ३ मृतदेह मिळून आले. दि. १६.०९.२०२१ रोजी शोध मोहीमेत ८ मृतदेह सापडले असे एकूण ११ मृतदेह मिळाले आहे.
(३) मच्छीमारांच्या होडयामध्ये नाविक अनेकदा क्षमतेपेक्षा जास्त पर्यटकांना बसवून जलसफारी घडवतात असे निदर्शनास आले नसून पोलीस स्टेशनला याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(४) घटनेतील उलटलेल्या नावेला मच्छीमार संस्थेचा मच्छीमारीचा परवाना असल्याचे निष्पन्न झाले आहे.
(५) सदर प्रकरणी मृतकातील एकाने नदीपात्रात ठेवलेली नाव नावमालकास न सांगता परस्पर घेवून नातेवाईकांसह नदीपात्रात घेवून गेले. पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने नाव पलटली व पाण्यात बुडाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अकस्मात मृत्यू अमृ.क्र. ३०/२०२१ क्र. १७४ प्रमाणे प्रकरण नोंदविला आहे. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय अमरावती यांच्या अहवालानुसार दुर्घटनेत वाहून गेलेल्या कोणालाही मासेमारी परवाने देण्यात आले नव्हते. सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन तथा दक्षता समितीला जनजागृती करण्याकरीता तसेच नावाडी यांनी लाईफ जॅकेटचा वापर करणे बाबत सूचना देण्यात आल्या आहेत. ११ मृत व्यक्तींना मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रु. दोन लक्ष एवढी मदत देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतक-यांनी पीक विमा कंपन्यांना ७२ तासांत नुकसानीची ऑनलाईन माहितीची जाचक अट शिथिल करण्याबाबत

**(२६) ३२७१५ (१२-११-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे शेतातील पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले असून पीक विमा कंपन्यांना ७२ तासांत नुकसानीची ऑनलाईन माहिती देण्याची जाचक अट असल्याने ऑफलाईन आलेल्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यामध्ये व राज्यातील इतर काही जिल्ह्यांमध्ये माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पडलेल्या अतिवृष्टीमुळे शेती वाहून जाऊन जमीनी खरडणे, पिके खराब होणे, शेतात पाणी साचणे तसेच सोयाबीन, मका, तुर, बाजरी, उडीद, मूग आदि पिके उध्वस्त होऊन शेतकऱ्यांच्या एकूण ३० ते ३५ लाख हेक्टर जमीनीवरील शेतीच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असताना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा तातडीने लाभ मिळवून देणेबाबत विमा कंपन्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच खरीप पिकांचे नुकसान झाले असताना शेतकऱ्यांकडे रब्बीची पेरणी करण्याकरिता पैसे नसल्याचे निदर्शनास आले असून पिकांचे नुकसान झाल्याबाबतची तक्रार शेतकऱ्यांनी ७२ तासांच्या आत ऑनलाईन पद्धतीने वैयक्तिकरित्या करणे बंधनकारक असल्यामुळे अनेक शेतकरी पीक विम्याच्या नुकसान भरपाईपासुन वंचित राहिले असल्याने शेतकऱ्यांनी पीक विम्याची रक्कम मिळण्यासाठी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विमा कंपन्यांकडे माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांनी विमा कंपनीकडे ऑनलाईन अथवा ऑफलाईनद्वारे नुकसान भरपाई मिळणेबाबत अर्ज दाखल केले असून किती शेतकऱ्यांना कंपनीकडून विमा रक्कम अदा करण्यात आली आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन ७२ तासांत नुकसानीची ऑनलाईन माहिती देण्याची जाचक अट शिथिल करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना संबंधित कंपनीकडून पीक विम्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दादाजी भुसे (२९-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखात दिसून येत नाही.

(४) योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२१ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत राज्यात १६.४७ लाख शेतकरी अर्जदारांनी ऑनलाईन (क्रॉप इंशुरन्स ॲपद्वारे) व २२.३२ लाख शेतकरी अर्जदारांनी ऑफलाईन (इतर स्त्रोताद्वारे) असे एकूण ३८.७९ लाख पूर्वसूचना दाखल

केल्या असून ३८.७९ लाख सूचनांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. दि.१७.११.२०२१ अखेर त्यापैकी २०.५८ लाख अर्जदारांचे नुकसान भरपाई निश्चिती झाली असून १०.२० लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. ५२८.५८ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत पूर्वसूचनांची परिगणना व नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) योजनेअंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत पिकाची नुकसानीची पूर्वसूचना ऑनलाईन (Crop Insurance App) द्वारे देता आली नसल्यास सदर नुकसानग्रस्त शेतकरी हा विमा कंपनीचा टोल फ्री क्रमांक, विमा कंपनीचे ई-मेल, विमा कंपनीचे तालुकास्तरीय कार्यालय, कृषि विभागाचे कार्यालय व ज्या बँकेत विमा जमा केला आहे इ. पर्याय पूर्वसूचना देण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आले होते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील ताबुत ईनाम इंडोमेंट ट्रस्टला (मौजे माण, ता.मुळशी, जि.पुणे) यांना जमीन अधिग्रहणाच्या भरपाईपोटी मिळणाऱ्या रक्कमेमध्ये बनावटकागदपत्रे गैरव्यवहार केल्याबाबत

**(२७) ३२७१७ (११-११-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या पुणे जिल्ह्यातील ताबुत ईनाम इंडोमेंट ट्रस्टला (मौजे माण, ता.मुळशी, जि.पुणे) सरकारकडून जमीन अधिग्रहणाच्या भरपाईपोटी मिळणाऱ्या रक्कमेमध्ये बनावट कागदपत्रे सादर करुन रु.७ कोटी ७६ लाख ९८ हजार रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट कागदपत्रे सादर करुन शासनाची तसेच वक्फ मंडळाची फसवणूक केल्याप्रकरणी इम्तियाज शेख व चाँद रमजान मुलानी या दोघांविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात दिनांक १४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास वक्फ मंडळाचे पुणे प्रादेशिक वक्फ अधिकारी यांनी तक्रार दाखल केली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आरोपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय.

दि.१३.०८.२०२१ रोजी बनावट कागदपत्रे सादर करुन शासनाची तसेच वक्फ मंडळाची फसवणूक केल्याप्रकरणी इम्तियाज शेख व चाँद रमजान मुलानी या दोघांविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात वक्फ मंडळाचे पुणे प्रादेशिक वक्फ अधिकारी यांनी तक्रार दाखल केली आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस आयुक्तालय, पुणे शहर अंर्तगत बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १७६/२०२१ भा.द.वि.क. ४२०, ४०६, ४६४, ४६७, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करुन ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे दोषारोप दि. २३/१०/२०२१ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं. ३ येथे सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिडकीन-तोंडोळी (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील शेतवस्तीमध्ये मजुरांच्या वस्तीवर दरोडेखोरांनी हल्ला केल्याबाबत**

**(२८) ३३१९३ (२३-११-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिडकीन-तोंडोळी (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील शेतवस्तीमध्ये दिनांक १९ ऑक्टोबर, २०२१ व २० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री मजूरीसाठी मध्यप्रदेशातून आलेल्या मजुरांच्या वस्तीवर सात सशस्त्र दरोडेखोरांनी हल्ला केला, हे खरे आहे काय,
(२) तसेच वस्तीतील पुरुषांचे हातपाय बांधून दोन महिलांवर सामूहिक बलात्कार केल्याची घटना निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दरोडेखोरांना पकडण्यासाठी पोलिसांनी कोणती कारवाई केली आहे तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन बिडकीन, ता.पैठण येथे गु.र.नं.३७०/२०२१, भा.दं.वि. कलम ३७६(ड), ३९५, ३९७, ४५८, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) या शिवाय MCOCA अंतर्गत कलम २३(१)(a) अन्वये कारवाई सुरु आहे.
सदर गुन्ह्यात एकूण ०७ आरोपी निष्पन्न झाले असून सर्व आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सध्या सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तपासादरम्यान गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्ह्यासंदर्भात मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**पांदण रस्ता मजबूत करण्याकरिता निधी मिळण्याबाबत**

**(२९) ३३६४८ (२३-११-२०२१). श्री.राजेश पवार (नायगांव), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागामध्ये शेताकडे जाणाऱ्या रस्त्यांपैकी प्रमुख रस्ता म्हणजे पांदण रस्ता असणे, या पांदण रस्त्यांबाबत अडचणी येत असून शेतकऱ्याला शेताकडे व अनेक ठिकाणी जाण्यासाठी रस्ते नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठमोठे वाद निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार पांदण रस्त्याचे मातीकाम करण्यासाठी फक्त रुपये ५०,०००/- चा निधी दिला जातो तसेच रोजगार हमी योजनेंतर्गतच करणे बंधनकारक असल्यामुळे जॉबकार्ड देऊनही काम करण्यासाठी मजुरी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पांदण रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी रुपये ७ लक्ष निधीची तरतुद असूनही अपूरी पडत असल्यामुळे काम करण्यासाठी देखील कोणतेही कंत्राटदार पुढे येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पांदण रस्ते मजबुत करण्याकरिता वाढीव निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-१२-२०२१) :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शासन निर्णय दि.११/११/२०२१ अन्वये मनरेगा व राज्य रोहयोच्या माध्यमातून मातोश्री ग्राम समृध्दी शेत/ पाणंद रस्ते योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी मनरेगाअंतर्गत अकुशल व कुशल खर्च करण्यात येत असून पूरक कुशल खर्च राज्य रोहयो अंतर्गत करण्यात येत आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मराठवाड्यासह नांदेड जिल्हयात विमा कंपनीकडून शेतकऱ्यांची होत असलेली फसवणूक**

**(३०) ३३६७० (२४-११-२०२१). श्री.राजेश पवार (नायगांव), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासह नांदेड जिल्हयात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे १०० % नुकसान झाले असून मराठवाड्यामध्ये अंदाजे १५ ते २० लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा कंपनीतर्फे पंचनामे योग्य प्रकारे होत नसल्याने इफ्को टोकियो कंपनी मार्फत पंचनामे करण्याकरिता आलेले प्रतिंनिधी १८ ते २४ वयोगटातील तरुण मुले असून त्यांना शेतीविषयक ज्ञान नसून त्यांना योग्य प्रशिक्षण दिले गेलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर विमा प्रतिंनिधी शेती विषयाशी निगडीत नसून १२ वी पास व कला शाखेचे पदवीधर असुन यातील ५० ते ८० % प्रतिंनिधीनी प्रथमच शेतीचे पंचनामे केले असून प्रतिंनिधी पंचनामे करण्या अगोदरच शेतकऱ्याचे पंचनाम्याच्या कोऱ्या फॉर्मवर सह्या घेत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन विमा कंपनीकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या फसवणुक करणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०९-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मराठवाड्यात जुलै ते सप्टेंबर २०२१ मधील अतिवृष्टी / पुरामुळे शेतीपिके / फळपिकांचे एकूण पिकाखालील ५१.८८ लाख हे. पैकी ३७.६७ लाख हे. क्षेत्राचे नुकसान/बाधीत झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ७१५०५१ पूर्वसूचनांचे सर्वेक्षण पुर्ण होऊन रक्कम रु. ४५८.०४ कोटी नुकसान भरपाई रक्कम निश्चित केली आहे. त्यापैकी रु. ३३०.५६ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर वीज केंद्राच्या विस्तारित प्रकल्पाच्या कामात कंत्राटदार कंपनीने गौणखनिजाची रॉयल्टी न भरल्याबाबत**

**(३१) ३३८३८ (२२-११-२०२१). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर वीज केंद्राच्या विस्तारित प्रकल्पाच्या संच क्र. ८ व ९ मधील कामात बीजीआर एनर्जी सिस्टीम लिमिटेड या कंत्राटदार कंपनीने मोठया प्रमाणात मेटल, रेजी, मुरुम, डस्ट आदी गौणखनिजाचा मोठया प्रमाणात वापर केला असताना उचल केलेल्या गौणखनिजाची रॉयल्टी अद्यापपर्यंत खनिकर्म विभागाला भरली गेली नसल्याने कंत्राटदाराने सुमारे ५ कोटी १३ लाख रुपयांच्या महसूलाचे नुकसान केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने कंत्राटदाराला रॉयल्टी आणि दंडाची रक्कम भरण्याबाबत पाचवेळा नोटीस बजावूनही बीजीआर एनर्जी सिस्टीम लिमिटेड कंपनी टाळाटाळ करित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुषंगाने सदरील रक्कम वसूल करण्यासह गौणखनिजाची रॉयल्टी न भरणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१०-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) मे. बीजीआर एनर्जी सिस्टीम लिमिटेड यांनी महाऔष्णीक विद्युत केंद्र विस्तार प्रकल्पाच्या बांधकामासाठी वापरण्यात

आलेल्या गौण खनिजाच्या १,४७,५४९.५५ ब्रास पैकी ५०,७११.८९ ब्रास परिमाणाच्या वाहतूक पासेस सादर केल्या आहेत व उर्वरीत ९६,८३७.६७ ब्रास परिमाणाच्या वाहतूक पासेस सादर न केल्यामुळे चुकवलेली स्वामित्वधनाची रक्कम व त्यावरील प्रतिवर्षी १५ टक्के व्याज याप्रमाणे रू.५,१३,९५,१४५/- शासनजमा करण्याबाबत अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दि.०७.०६.२०२१ रोजी सदर कंपनीला नोटीस बजावण्यात आली असून याबाबतची सुनावणी दि.२४.०८.२०२१ व दि.८.०९.२०२१ रोजी अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समर्पण कॉलनी (जि.अमरावती) येथे चायनिज मांजामुळे एका तरुणीच्या गळ्याला जखम होऊन मृत्यू झाल्याबाबत**

**(३२) ३४०४९ (२४-११-२०२१). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समर्पण कॉलनी (जि.अमरावती) येथे मोपेड वरुन जाताना एका परिचारीका असलेल्या तरुणीचा चायनिज मांजामुळे गळ्याला जखम होऊन तिचा मृत्यू झाल्याचे दिनांक २३ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी बंदी असतानाही पतंग उडविताना वापरण्यात येणाऱ्या चायनिज मांजाची बेधडक विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन तरुणीच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्यासह तसेच चायनिंग मांजा विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
नमुद प्रकरणी गाडगेनगर पोलीस स्टेशन, अमरावती येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(२) नॉयलॉन मांजा विक्री वर शासनाने बंदी आणलेली असली तरी लपूनछपून गैरमार्गाने नॉयलॉन मांजाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यक्षेत्रात अशा प्रकारच्या नॉयलॉन मांजा विक्री करणाऱ्या/वापर करणाऱ्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.
(३) सदर प्रकरणी अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा क्र.२१३४/२०२१ भा.द.वि. कलम ३०४ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यक्षेत्रातील मांजा विक्री करणाऱ्या विरुध्द फ्रेजरपुरा, बडनेरा, नागपूरी गेट येथील पोलीस स्टेशन अंतर्गत भा.द.वि.कलम १८८ व कलम ५, भारतीय पर्यावरण संरक्षण अधिनियम मधील तरतुदीनुसार ०४ गुन्हे दाखल करण्यात आले असून कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबा चोंडी (ता.वसमत, जि.हिंगोली) शिवारातील बंधाऱ्याचे गेट चोरीस गेल्याबाबत**

**(३३) ३५२०७ (२४-११-२०२१). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबा चोंडी (ता.वसमत, जि.हिंगोली) शिवारातील पावसाळ्यात गावात पाणी शिरु नये म्हणून काढून ठेवण्यात आलले रुपये १ लाख ४५ हजार रुपये किंमतीचे ६० गेट दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास चोरीस गेल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी हिंगोली जिल्हा परिषदेचे लघु सिंचन विभागाचे उपअभियंता यांनी तेथील कुरुंद पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली असून पोलिसांकडून कोणालाही अटक करण्यात आले नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी तपास करुन चोरी करणाऱ्यांना अटक करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) श्री. अशोक भंगीरे, उप अभियंता, लघु सिंचन, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी, अज्ञात आरोपींनी रुपये १,५३,०००/- किमतीचे कोल्हापूरी बंधाऱ्याचे ६० लोखंडी गेट चोरुन नेल्याची फिर्याद दिनांक १२.१०.२०२१ रोजी पोलीस ठाणे कुरुंदा, जिल्हा हिंगोली येथे दिली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस ठाणे कुरुंदा, जिल्हा हिंगोली येथे गु.र.नं.२११/२०२१ भा.दं.वि.कलम ३७९, ४११, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यात ०२ आरोपींना दिनांक २२.१०.२०२१ रोजी अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींस अटक करण्याची कार्यवाही सुरु असून तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**नागपूर येथे इथेरियम ट्रेड या फायनास् कंपनीने हजारो गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत**

**(३४) ३५३४५ (२५-११-२०२१). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील इथेरियम ट्रेड या फायनान्स कंपनीने हजारो गुंतवणूकदारांची कोटयावधी रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, करुन कंपनीच्या संचालक मंडळावर कोणती कार्यवाही केली आहे

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कंपनीच्या संचालक मंडळावर कोणती कारवाई केली तसेच कंपनीत गुंतवणूक करणाऱ्यांना त्यांची गुंतवणूक परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

नागपूर येथील इथेरियम ट्रेड या फायनान्स कंपनीने हजारो गुंतवणुकदारांची कोटयावधी रुपयाची फसवणूक केली असल्याने दि.१७ एप्रिल, २०२१ रोजी पोलीस स्टेशन, यशोधरानगर नागपुर शहर येथेअप. क्र.२८८/२१ कलम ४२०, ४०६, ४०९, १२०(ब), भा.द.वि. सह कलम ३, ४ एम.पी.आय.डी. कायदा १९९९, सह कलम ६६ (ड)माहिती तंत्रज्ञान(सुधारणा अधिनियम २००८, रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया ॲक्ट १९३४ चे कलम ५८(ब)(५) (अ)अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

(२) व (३) उपरोक्तप्रमाणे दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने ३ आरोपींना अटक केली असून सद्या सदर आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. आरोपीपिरुध्द दोषारोप पत्र मा. सत्र न्यायालय नागपूर येथे सादर करण्यात आले आहे. इतर आरोपींचा शोध चालु आहे.

एम.पी.आय.डी. अंर्तगत मालमत्ता जप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याकरीता आरोपी व त्यांचे नातेवाईकांचे स्थावर व जंगम मालमत्ता यांचा शोध घेवुन त्या जप्त करण्याची कारवाई चालू आहे. आरोपींची विविध बॅकेतील खाती गोठविण्यात आली आहेत. सदर प्रकरणी नेमलेल्या सायबर तज्ञाकडून माहिती व मार्गदर्शन घेवून इतर मालमत्तेचा शोध चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोरेगाव (मुंबई) येथील आरे वसाहतीमधील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३५) ३५४१८ (२५-११-२०२१). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील आरे वसाहतीमध्ये अनधिकृत फेरीवाले व अनधिकृत बांधकामांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने या परिसरात सार्वजनिक आरोग्याचा, वाहतुक कोंडीचा व बकालपणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत तसेच या परिसरातील अनधिकृत फेरीवाले यांचेवर योग्य ती कारवाई करण्याबाबत अथवा त्यांचे अन्य ठिकाणी स्थलांतर करून येथील नागरिकांच्या आरोग्याचा तसेच वाहतुक कोंडीचा प्रश्न सोडविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनास वारंवार निवेदन अर्ज सादर केली असून, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे प्रशासन यांचे सोबत बैठक आयोजित केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकाम प्रकरणी स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी आजवर केलेल्या तक्रारींवर कोणतीच कार्यवाही न करता येथील अनधिकृत बांधकामांना संबंधित अधिकारी अभय देत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या परिसरातील अनधिकृत बांधकामे व फेरीवाल्यांवर व तक्रार करुनही कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच भविष्यात या फेरीवाल्यांची व अनधिकृत बांधकामांची संख्या वाढू नये याकरीता शासनाने कोणती खबरदारी वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०७-१२-२०२१) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) आरे दुग्ध वसाहतीमधील अनधिकृत बांधकामावर तसेच अनधिकृत फेरीवाले व्यवसायावर या कार्यालयाच्या सुरक्षा विभागामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

अनधिकृत बांधकामे व व्यवसायास आळा घालण्यासाठी फिरते पथक नियुक्त करण्यात आले असुन त्याद्वारे नोटीसा काढणे, निष्कासन करण्यात येते.

अनधिकृत फेरीवाले व अनधिकृत बांधकामे यांची भविष्यात संख्या वाढू नये यासाठी सुरक्षाव्यवस्थेत बळकटी आणण्यात येत असुन महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा व्यवस्था घेण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**जत तालुकयातील पर्जन्यमापक (हवामान मापक) योग्य अंतरावर शासकीय निकषानुसार बसविण्याबाबत**

**(३६) ३५६२९ (२४-११-२०२१). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील अनेक शेतक-यांनी सन २०१९-२० या कालावधीत पिक विमा भरला असताना जत तालुक्याचे क्षेत्रफळ २,२४८२४ इतके मोठे असून तालुक्यात हवामान मापक शासकीय निकषानुसार उपलब्ध तसेच हवामान मापक केवळ ६ असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बाबीमुळे जत तालुक्यातील ऊफळापूर, शेगांव, कुंभारी, वाळेखिंडी, उमदी, उटगीसह सुमारे ७० गावांतील चुकीची व अपूर्ण माहिती कृषी विभागाकडून विमा कंपन्यांना गेल्यामुळे शेतक-यांना पिक विम्याच्या रक्कमेपासुन पासून वंचित राहावे लागल्याने त्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जत तालुक्यातील पर्जन्यमापक (हवामान मापक) योग्य अंतरावर शासकीय निकषानुसार बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०७-१२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

जत तालुक्यात अस्तित्वात असलेल्या एकूण ८ महसूल मंडळात प्रत्येकी एक या प्रमाणे एकूण ८ स्वयंचलित हवामान केंद्र मार्च २०१७ मध्ये शासकिय निकषानुसार बसविले आहेत.
(२) नाही, हे खरे नाही.

सन २०१९-२० मध्ये फळपिक विमा योजनेत मृग बहारमध्ये जत तालुक्यातील एकूण ६५३९ शेतक-यांना रक्कम रु. १३६७.२७ लाख व अंबिया बहारमध्ये एकूण ५६०१ शेतक-यांना रक्कम रु. २६६१.६४ लाख इतकी विमा भरपाई देण्यात आलेली आहे.

(३) कृषि आयुक्तालयामार्फत स्वयंचलित हवामान केंद्राची तपासणी करुन, जत तालुक्यातील कुंभारी व उमदी महसूल मंडळस्तरावरील स्वयंचलित हवामान केंद्र पर्यायी जागेवर स्थलांतरीत करणेबाबत जिल्हास्तरीय यंत्रणेला सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच जत तालुक्यात आणखी एक नव्याने निर्मित महसूल मंडळस्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र प्रस्थापित करणे बाबत कार्यवाही करणेत येत आहे.

सबब, जत तालुक्यातील महसूल मंडळस्तरावरील दोन स्वयंचलित हवामान केंद्राची पर्यायी जागेवर स्थलांतर करणेबाबत तसेच नवनिर्मित महसूल मंडळ स्तरावर नवीन स्वयंचलित हवामान केंद्र प्रस्थापित करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतंर्गत लक्षांक व निधी देण्याबाबत

**(३७) ३५६८५ (२३-११-२०२१). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मागील वर्षापासुन भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतंर्गत लक्षांक व निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे शेतकरी सदर योजनेपासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्यासाठी लक्षांक व त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध नसल्यामुळे अर्ज करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत लक्षांक व निधी न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना सदर योजनेतंर्गत लक्षांक व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-१२-२०२१) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना व राज्याची स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या दोन्ही योजनेचे मुख्य उद्‌दीष्ट हे फळबागांची लागवड करणे हे आहे. वित्त विभागाने दिनांक ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याचा भाग म्हणून स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या राज्य योजनेंतर्गत नव्याने दायित्व निर्माण न करता केंद्र पुरस्कृत महात्मा

गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत नव्याने लक्षांक व निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात उपविभागीय अधिकारी यांनी चुकीच्या पद्‌धतीने शासनाचे नुकसान केल्याबाबत**

**(३८) ३५७२२ (२४-११-२०२१). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील तहसीलदार यांनी अवैधरीत्या उत्खनन केल्याप्रकरणी एनसीसी लिमिटेड कंपनी तसेच उपाध्याय कन्स्ट्रक्शन कंपनी यांची शहानिशा करून सुमारे २५ कोटी ६६ लक्ष रुपयाचा दंड शासनाकडे जमा करण्याचे आदेश पारित केलेले असताना उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांच्याकडे गैरअर्जदार अपीलामध्ये गेल्यानंतर उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांनी दंड माफ केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित दोन्ही कंपन्यांनी शासकीय परवानगी नसताना शेतकऱ्यांची शेती खोदल्याचे आढळून आले असुन कोणत्या आधारावर उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांनी दंड माफ करुन शासनाचे नुकसान केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शासनाच्या झालेल्या नुकसानीबाबत व शेतकऱ्यांवर झालेला अन्याय याची दखल घेऊन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मौजे खेडपिंपरी, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील गट क्र.६५ मध्ये दोन्ही कंपन्यांना गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक करण्यास जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेमार्फत परवानगी देण्यात आली होती. तथापि, सदर कंपन्याने गौणखनिजाचे उत्खनन हे गट क्र.६५ ऐवजी गट क्र.६४ मध्ये केल्याने संबंधित कंपन्याविरूध्द तहसिलदार, नांदगांव खंडेश्वर यांनी दि.२६.०४.२०२१ रोजीच्या आदेशान्वये दंडात्मक कारवाई केली. सदर दंडात्मक आदेश उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांनी दि.२७.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये रद्द केले.

सदर आदेशाविरूध्द अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले असून सदर अपीलावर अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सुनावणी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदवड, देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी मुख्यालयी राहत नसल्याबाबत.**

**(३९) ३५८५९ (२४-११-२०२१). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड, देवळा (जि.नाशिक) तालुक्यात शासनाने सन २०१८ या कालावधीत सुमारे ५ कोटी ४५ लक्ष रुपये खर्च करून २२ तलाठी कार्यालय व निवासस्थान बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहून लोकांच्या अडचणी सोडविण्याच्या हेतूने सदर कार्यालय बांधण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठी कार्यालय पूर्ण होवून ३ वर्ष झाल्यानंतरही तलाठी मुख्यालयी राहत नसल्याने शेतक-यांची कामे तात्काळ पूर्ण होत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निवासस्थानाची व्यवस्था करून देखील मुख्यालयी राहत नसलेल्या तलाठ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) होय. देवळा तालुक्यात १० ठिकाणी तर चांदवड तालुक्यात १२ ठिकाणी तलाठी कार्यालय व निवासस्थान बांधण्यात आलेली आहेत. सदर २२ इमारतीवर ४ कोटी ७४ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

(२) होय.

(३) चांदवड तालुक्यातील ११ तर देवळा तालुक्यातील ०४ तलाठी मुख्यालयी राहत नसलेबाबत तहसिलदार यांनी केलेल्या पडताळणीत आढळुन आले आहे. तथापी, सदरबाबीमुळे शेतकऱ्यांची कामे तात्काळ पुर्ण होत नाहीत, अशी बाब निर्दशनास आलेली नाही.

(४) व (५) संबंधीत तलाठी यांचे घरभाडे भत्ता बंद करण्यात आला आहे. तसेच तहसिलदार यांचेमार्फत संबंधतींना नोटीसा देऊन प्राप्त खुलाशाअंती पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

**केम तुकूम (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील एका अल्पवयीन विद्यार्थिनींशी मुख्याध्यापकाने केलेला अश्लील गैरप्रकार**

**(४०) ३५९२९ (२४-११-२०२१). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केम तुकूम (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनींशी मुख्याध्यापक अश्लिल गैरप्रकार करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी विद्यार्थिनींच्या पालकांनी बल्लारपूर पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने अल्पवयीन विद्यार्थिनीशी अश्लिल गैरप्रकार करणाऱ्या मुख्याध्यापकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) याबाबत बल्लारपुर पोलीस स्टेशन, जि. चंद्रपूर येथे आरोपीविरूध्द भा.दं.वि. कलम ३७६ (क ख), ३७६ (२) (च) सह लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६, ८, १२, प्रमाणे गु.र.क्र. ११२२/२०२१ अन्वये दिनांक ०४.१०.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दिनांक ०४.१०.२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपी विरुध्द न्यायालयात दिनांक २९.१०.२०२१ रोजी दोषारोप पत्र क्र. २०४/२१ दाखल करण्यात आले आहे. आरोपी हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केम तुकूम, ता. बल्लारशाह येथे मुख्याध्यापक असल्याने आरोपीस अटक केल्याची आणि सदर गुन्ह्याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना पाठविण्यात आला असून, सदर आरोपीला अटक केल्याच्या दिनांकापासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऊर्जापूर-दुर्गापूर (जि.चंद्रपूर) येथे विषारी वायु गळतीमुळे नववधूसह सहा जणांच्या झालेला दुदैवी मृत्यु

**(४१) ३६००२ (२४-११-२०२१). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊर्जापूर-दुर्गापूर (जि.चंद्रपूर) येथे (वार्ड क्र.३) झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक वीजपुरवठा खंडीत झाल्याने डिझेलवर चालणारे जनरेटर सुरु केल्यावर त्यातून विषारी वायुगळती होऊन तेथील लष्करे कुटुंबांतील नववधूसह सहा व्यक्तींचा गुदमरुन दुदैवी मृत्यु झाल्याचे दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास दुर्घटना घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी या दुर्घटनेनंतर लगेचच तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्वसामान्य जनतेकडून करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार याप्रकरणी सदर दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणावर आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) होय.
फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दुर्गापूर, जि. चंद्रपूर येथे अकस्मात मृत्यू क्र. २७/२०२१ कलम १७४ जा. फौ. प्रमाणे नोंद केली आहे.

(२) होय.

सदर दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी मा. श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी केली आहे.

(३) सदर अकस्मात मृत्यू प्रकरणी मृत्यु पावलेल्या सर्व मृतकांचे शवविच्छेदन अहवाल प्राप्त करण्यात आले असून वैद्यकिय अधिकारी यांनी मृत्यूचे कारण opinion Reserved, however sample preserved for CA and histopathlogy असे नमूद केले आहे. विद्युत निरीक्षक, विद्युत कार्यालय रामनगर, चंद्रपूर यांचेकडून विविध मुद्दयावर माहिती प्राप्त करण्यात आली असता घटनेवेळी जनरेटर उघडया जागेऐवजी बंद खोलीत सुरु असल्याने त्यांच्या Exaust मधुन निघणा-या धुराच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीचा गुदमरुन मृत्यु घडला असावा असा अभिप्राय दिलेला असुन सदर प्रकरणात पुढील चौकशी सुरु आहे.

(४) सदर प्रकरणातील मृत्यू पावलेल्या मृतकांचे नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन विशेष बाब म्हणून मृतांच्या ३ कायदेशीर वारसांना प्रत्येकी २,००,०००/- याप्रमाणे रु.६,००,०००/- इतके अर्थसहाय्य मंजुर केले असून धनादेश वितरीत करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन तुकडेबंदीसंदर्भात शासनाने काढलेल्या परिपत्रकामुळे जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात येत असलेल्या अडचणी

**(४२) ३६०३० (२४-११-२०२१). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व दुय्यम निबंधकांना नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी तुकडेबंदी तुकडे जोड सुधारणा अधिनियमाच्या “कलम ब” ला अनुसरुन तुकडेबंदीबाबत परिपत्रक जारी करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत कळविले असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकानुसार सर्व्हे नंबरचे क्षेत्र २ एकर असल्यास त्यापैकी एक, दोन व तीन गुंठे जागा विकत घेण्याकरीता सदर क्षेत्राचे दस्त नोंदणी होणार नसून त्याकरीता सदर क्षेत्राचे ले-ऑऊट करणे बंधनकारक असल्यामुळे ज्या खातेदारांचे मिळकत क्षेत्र हे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा म्हणजेच २ एकर पेक्षा कमी असेल असे खातेदार आपले संपूर्ण क्षेत्र विक्री करत असतील तर अशा खातेदारांना खरेदी-विक्री व्यवहाराच्या अडचणी निर्माण होत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयांसह कोकण प्रदेशातील अन्य ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या मिळकतीचे क्षेत्र हे प्रमाणभूत क्षेत्राच्या मर्यादेपेक्षा कमी असल्याने व ७/१२ च्या उताऱ्यात तुकडा अशी नोंद असल्याने मिळकतीच्या खरेदी-विक्री करण्यास शेतकऱ्यांपुढे अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त परिपत्रकातील कायदेविषयक तांत्रिक बाबी दूर करुन सुधारित परिपत्रक निर्गमित करण्याबाबत कोकण प्रदेशातील शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल

मंत्री यांना निवेदन सादर करुन मागणी केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सुधारित परिपत्रक निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०८-१२-२०२१) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ च्या तरतूदीनुसार एखादया सर्व्हे नंबरचे क्षेत्र प्रमाणभूत क्षेत्राप्रमाणे असल्यास अशा जमिनीच्या व्यवहाराची दस्त नोंदणी होऊ शकते.

तसेच एखादया सर्व्हे नंबरमधील क्षेत्र प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असेल व अशा क्षेत्रातील एक, दोन अथवा तीन गुंठे जागा विकत घ्यायची असेल तर त्या सर्व्हे नंबरचा 'ले-आऊट' करुन त्यामध्ये एक, दोन गुंठयांचे तुकडे पाडून त्यास जिल्हाधिकारी किंवा सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेतल्यास, अशा मान्य 'ले-आउट' मधील एक, दोन गुंठे जमिनीच्या व्यवहाराची दस्त नोंदणी होऊ शकते.

(३) व (४) होय. हे खरे आहे.

कोकण विभागातील मिळकतीच्या दस्तांची नोंदणी करताना येणाऱ्या अडचणींसंदर्भात शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(५) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेल्या दि. १२/०७/२०२१ रोजीच्या परिपत्रकाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ येथे याचिका दाखल झालेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अंतिम न्यायनिवाडयानंतर शासनस्तरावर यथायोग्य कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

---

## अणसुरे (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथील शेतकरी व आंबा उत्पादकांच्या झालेल्या नुकसानीबाबत

**(४३) ३६१२५ (०२-१२-२०२१). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणसुरे (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथील शेतकरी व आंबा उत्पादकांनी कृषी औषधांचे व्यापारी श्री.पेठे ब्रदर्स यांनी मुदत संपलेली औषधे विक्री केल्याने आंबा पिकांचे नुकसान झाल्याबाबतची तक्रार दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीची जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दखल न घेतल्याने तक्रारदारांनी सह सचिव, कृषी विभाग यांचेकडे तक्रार केली असता त्यांनी कृषी आयुक्त यांना या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश दिले असता त्यांनी सह संचालक कृषी यांनी या प्रकरणी चौकशी करण्याबाबत निदेश दिले असता त्यांनी गुण नियंत्रण अधिकारी व विभागीय सह संचालक (कृषी) यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अधिकाऱ्यांनी मुदत संपलेली औषधे विक्री करणाऱ्या दुकानदारास व तक्रारदारांस समक्ष बोलावून चौकशी करण्याऐवजी केवळ तक्रारदारांस पुरावे सादर करण्यासंबंधी पत्र देऊन कार्यवाही करुन अहवाल सादर केला, हे ही खर आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत योग्य ती कार्यवाही न करणाऱ्या चौकशी अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२२-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) तक्रारदारास आवश्यक कागदपत्र सादर करण्याबाबत पत्र दिले आहे.
(४) सदर प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन, तक्रारीची चौकशी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्याचे दिनांक ११/१२/२०१९ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले आहे. तथापि, तक्रारदार यांनी अद्याप माहिती सादर केलेली नाही. त्यामुळे सदर चौकशी पूर्ण करता आलेली नाही. सद्य:स्थितीत मे. पेठे ब्रदर्स यांनी तक्रारदार यांच्यावर धनादेश न वठल्याप्रकरणी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी या न्यायालयामध्ये Negotiable Instruments Act Section १३८ अंतर्गत खटला दाखल केला आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी, रायगड हया जिल्हयांमध्ये वाळूची लिलाव प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ३६१३५ (२४-११-२०२१). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी, रायगड हया जिल्हयांमध्ये मागील दोन वर्षामध्ये वाळूची लिलाव प्रक्रिया प्रलंबित असल्यामुळे रॉयल्टीतून मिळणारा कोट्यावधी रुपयांचा महसूल शासनाला मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू लिलाव प्रलंबित असल्यामुळे वाळू अभावी बांधकाम क्षेत्रातील कामे होत नसुन या क्षेत्राशी निगडीत असणाऱ्या सर्वच घटकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, वाळू उपसा होत नसल्यामुळे नदयांचे पात्र वाळूने भरले असल्याने पावसाळ्यात पाणी वाहून जाण्यास अडचणी निर्माण होवून महापूर येण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू जिल्हयांमध्ये बांधकाम क्षेत्रातील अडचणी दूर करुन तातडीने वाळू लिलाव करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) रायगड जिल्ह्यात खाडीपात्र क्षेत्रामध्ये गाळ/रेजगा/ दगड-गोटे/वाळू इ.साचल्याने प्रवाहास अडथळा निर्माण होऊन पूरपरिस्थितीची शक्यता आहे.

(४) सन २०२१-२२ करीता अपसेट प्राईस निश्चित करुन यांत्रिकी पध्दतीने उत्खननासाठी राखीव लिलाव गटाकरीता ई-लिलाव प्रक्रिया राबविणे तसेच डुबी/हातपाटीद्वारे उत्खननासाठी राखीव गटाकरीता जाहिरात देऊन परवाना पध्दतीने वाळू / रेती निर्गती करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ येथे जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात लाखो रुपयांचा गैरवापर केल्याबाबत**

**(४५) ३६२१५ (२४-११-२०२१). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथे जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात असलेली इमारत जीर्ण झाली असून त्या जागी नविन इमारत बांधण्याकरीता जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जा.क्र.नियोजन/जिवायो/पो.वी./१९-२०/१९४/२०१९ रोजी पाच कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयात जीर्ण इमारतीच्या जागेवर नविन इमारत उभी करण्याऐवजी बांधकाम विभागाची कुठलीही परवानगी न घेता नुतनीकरण करण्यात आल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खुलासा केल्याने पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी चौकशी समिती गठीत करुन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत १५ दिवसात अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाने उक्त इमारतीच्या जागी नव्या इमारतीकरीता निधी उपलब्ध करुन दिल्याने लाखो रुपयांचा गैरवापर झाल्यामुळे शासनाचे लाखो रुपये पाण्यात गेले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलीस अधिक्षक कार्यालयाची इमारत ही जवळपास अंदाजे १०० ते १२५ वर्ष जुनी असल्याने इमारत पाडून त्या जागी नविन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VNIT), नागपूर यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांना दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखीस्वरुपात पत्राव्दारे सांगितले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणात दोषी आढळलेल्या गैरजबाबदार अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-१२-२०२१) :** (१) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांचे दिनांक ०६/०८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, कार्यालय येथील इमारतीचे विस्तारीकरण करणे यासाठी रु.४.९९ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सन २०१९-२० मध्ये जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांच्या दिनांक ३१/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये रु.१.०० कोटी इतका निधी बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला होता. परंतु सदर काम विहीत कालावधीत पूर्ण होऊ शकत नसल्याने उक्त निधी दिनांक ३०.०३.२०२० रोजी जिल्हा नियोजन समितीकडे परत करण्यात आलेला होता. तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या विस्तारीकरण व बांधकामासाठी कोणताही निधी उपलब्ध झालेला नाही.

(२) व (३)

I. पोलीस अधीक्षक, यवतमाळ, कार्यालयाच्या जुन्या इमारतीमध्ये कार्यरत जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष तसेच डायल-११२ MERS (Maharashatra Emergency Response System) या प्रकल्पासाठी आवश्यक किरकोळ दुरुस्ती व किरकोळ बांधकामे मूळ इमारतीच्या संरचनेमध्ये कोणताही बदल न करता वित्तिय नियमावलीचे अनुपालन करुन पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच "किरकोळ दुरुस्ती व किरकोळ बांधकाम" या लेखाशीर्षातंर्गत करण्यात आलेल्या सदर कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ यांची परवानगी घेण्यात आली होती.

II. दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाल्यानुसार मा.अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती तथा पालकमंत्री यवतमाळ जिल्हा यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना सूचना दिल्या होत्या. तसेच जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ, यांच्या कार्यालयाकडून सदर प्रकरणी अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना कळविण्यात आले होते.

III. जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ, यांना जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांनी दिनांक १०/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी अहवाल सादर करण्यास कळविले असून त्याबाबतचा अहवाल अप्राप्त आहे.

(४) होय, हे खरे आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक यवतमाळ यांनी त्यांचे दिनांक ८/८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, कार्यालयाच्या जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन देण्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VNIT), नागपूर, या शासन मान्यता प्राप्त संस्थेकडून त्यांचे दिनांक १९.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला अहवाल दिनांक १८.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना सादर करण्यात आला आहे.

(५) व (६) जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ, यांच्याकडून अहवाल मागविला आहे. त्याअनुसार अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील उचित कार्यवाही नियोजित आहे.

---

**यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा तालुक्यात गौण खनिजाचे मोठया प्रमाणात अवैद्य उत्खनन होत असल्याबाबत**

**(४६) ३६२६१ (२४-११-२०२१). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळापूर (जि.यवतमाळ) तालुका हा नैसर्गिक साधन संपत्तीने समृध्द असून जंगल क्षेत्रही मोठया प्रमाणात असल्याने सदर परिसरात टेकडयांची संख्याही भरपूर प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल व वन विभागाच्या हद्दीतील पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील टेकडया, जंगल, जमीन तसेच नदी, नाल्यातून मोठया प्रमाणात गौण खनिजांचे अवैध उत्खनन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील टेकडया फोडून त्यातून मुरुमाचे अवैध उत्खनन होवुन नदी, नाल्याची पात्रे विस्तारत असल्याने परिसरातील गावांना पुराचा धोका निर्माण झालेली आहे, तसेच, तस्करांनी उक्त भागातील टेकडया हया मुरुमासाठी पोखल्या असल्यामुळे जंगलातील रस्त्यालगत खड्डे पडलेले निदर्शनास येत असुनही संबंधित विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त परिसरात होणारे गौण खनिजांचे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१३-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (ता.हवेली, जि.पुणे) येथे विटांच्या निर्मितीसाठी अनधिकृतरित्या गाळ काढल्याबाबत**

**(४७) ३६४०६ (२४-११-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (ता.हवेली, जि.पुणे) येथील एका कंत्राटदाराने विटांच्या निर्मितीसाठी १ हजार २७५ ब्रास गाळ अनधिकृतरित्या काढल्याप्रकरणी त्याच्याकडून ३० लाख ७१ हजार रूपये शास्ती व स्वामित्वधनापोटी वसूल करण्याचा आदेश माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे, २०१५ ची अधिसूचना व माहे जुलै, २०१५ चे परिपत्रकानुसार विटा निर्माण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मातीच्या स्वामित्वधनाचे दर हे प्रति ब्रास १६० रूपये तर विटासाठीच्या गाळाचा बाजार भाव प्रति ब्रास १ हजार रूपये इतका होता त्यामुळे उक्त अधिसूचना व परिपत्रकानुसार संबंधित गाळ काढणाऱ्यांकडून स्वामित्वधन शास्तीपोटी रूपये ६५ लाख ८३ हजार इतकी रक्कम वसूल करणे आवश्यक असताना सदरहू रक्कम ३५ लाख १२ हजार रूपयांनी कमी आकारून शासनाच्या महसुलाचे नुकसान करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शास्ती व स्वामित्वधनापोटी वसूल करावयाची रक्कम कमी आकारणारे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधित कंत्राटदाराकडून शास्ती व स्वामित्वधनापोटीची उर्वरीत रक्कम वसूल करण्याबाबत तसेच या प्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१०-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांचे कार्यालयाचे परिपत्रक दि.१७/१२/२०१६ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन केल्याप्रकरणी दंडात्मक कारवाई करण्याकरिता माती या गौण खनिजाकरिता बाजारभावाची किंमत रु.४००/- एवढी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार एका कंत्राटदाराने १२७५ ब्रास अवैध माती साठा केल्याप्रकरणी तत्कालीन तहसिलदार हवेली यांनी दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये संबंधितावर स्वामित्वधनाची रक्कम, टीडीएस व बाजारभावाच्या पाच पट दंड अशी एकूण रु.३०,७०,५०६/- एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

सदर आदेशविरुध्द संबंधितांनी उप विभागीय अधिकारी हवेली यांचेकडे अपील केले असता, उप विभागीय अधिकारी हवेली यांनी दि.०८/०९/२०२० रोजीच्या आदेशानुसार तहसिलदार हवेली यांचा दि.११/१२/२०१७ रोजीचा निर्णय कायम केला.

उप विभागीय अधिकारी हवेली यांच्या दि.०८/०९/२०२० रोजीच्या आदेशाविरुध्द संबंधितांनी अपर जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे अपील केले असता अपर जिल्हाधिकारी पुणे यांनी दि.३०/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये तहसिलदार हवेली यांनी फेरचौकशी करुन आदेश पारीत करण्याबाबत आदेशीत केले आहे. त्याअनुषंगाने फेरचौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे अनुदान शेतकऱ्यांना अदा न केल्याबाबत**

**(४८) ३६४७० (२४-११-२०२१). श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेतकरी फळबाग लागवडीकरीता पात्र ठरु शकत नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी शासनाने सन २०१८ या कालावधीपासून राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सुरु केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सन २०१८ या कालावधीत सदर योजनेंतर्गत फळबाग लागवड केलेली असतांना या शेतकऱ्यांना शासनाकडून देय असलेले रुपये ७५ लाख ६५ हजार इतके अनुदान अद्याप शासनाकडून देण्यात आले नसल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचप्रमाणे सन २०१९-२०२० या कालावधीत १३४ हेक्टर व सन २०२१ या कालावधीत ४८ हेक्टर अशा एकूण १८२ हेक्टरवर ३५७ शेतकऱ्यांनी फळबाग लागवड करुनही त्यांना अनुदान देण्यात आले नाही तसेच मागील दोन वर्षापासून सदर फळबाग योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लक्षांक देखील देण्यात आले नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे तसेच थकीत अनुदान वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना व राज्याची स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या दोन्ही योजनेंतर्गत फळबागांची लागवड करण्यात येते. दोन्ही योजनेचे मुख्य उद्दीष्ट हे फळबागांची लागवड करणे हे असल्याने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाबाबत उपाययोजनेचा भाग म्हणून वित्त विभागाने दिनांक ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेस अनुसरुन स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या राज्य योजनेंतर्गत सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन आर्थिक वर्षात नव्याने दायित्व निर्माण न करता केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सदर योजनेंतर्गत नव्याने लक्षांक देण्यात आलेला नाही.

सन २०१८-१९ व सन २०१९-२० या आर्थिक वर्षात स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत फळबागांची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना अनुदानाचे प्रलंबित दायित्व अदा करण्यासाठी दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषी) यांना निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून क्षेत्रीय कार्यालयामार्फत लवकरच लाभधारक शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये प्रलंबित अनुदानाची रक्कम जमा करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वरुड, मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यात एच जी इन्फ्रा कंपनीने अवैधरित्या गौण खनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(४९) ३६५०३ (२४-११-२०२१). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड, मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अमरावती ते वरुड, वरुड ते नागपूर व वरुड ते पुसला या रस्त्यांचे बांधकाम करणाऱ्या एच जी इन्फ्रा कंपनीने सन २०१९ या कालावधीत मध्ये मोठ्या प्रमाणावर वाळू, मुरुम, स्टोन गिट्टी आदी अवैध गौण खनिजांचे उत्खनन करुन शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा महसूलाचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने सदर तालुक्यात अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्या एच जी इन्फ्रा कंपनी तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मत्स्यदुष्काळ जाहीर करुन मत्स्य व्यावसायिकांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(५०) ३६६२३ (२४-११-२०२१). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोवीड व अतिवृष्टीने मत्स्य दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे माशांचे उत्पादन व ग्राहकांच्या खरेदीत घट झाल्याने पारंपारिक मत्स्य व्यावसायिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई बंदरासह राज्यात इतरत्र जेलीफिशचे झालेले अतिक्रमण व परप्रांतीय हायस्पीड ट्रॉलर्सकडून एलईडी पद्धतीने होणाऱ्या मासेमारीमुळे मासळी उत्पादनात घट झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार राज्यात मत्स्यदुष्काळ जाहीर करुन मत्स्य व्यावसायिकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) कोकणातील किनारी भागात चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या मत्स्यदुष्काळाबाबत निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय क्र. मत्स्यवि ११२०/प्र. क्र. ७२/पदुम १४, दि. ९ डिसेंबर, २०२० अन्वये प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.